महानगरपालिका,नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या निवडणुकीच्या कर्तव्यांवर असतांना जखमी झालेल्या अधिकारी/कर्मचा-यांना तसेच मृत झालेल्या अधिकारी/कर्मचा-यांच्या कुटुंबियाना सानुग्रह अनुदान देणेबाबत.

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक : रानिआ/नप-२०१६/प्र.क्र. २४/का-०६
नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा रोड, मुंबई:- ४०० ०३२.
दिनांक :- २८/११/२०१६.

**आदेश**

विषय :- महानगरपालिका,नगरपरिषदा व नगरपंचायत निवडणुकीच्यावेळी कर्तव्यावर असताना मृत पावलेल्या कर्मचा-यांच्या वारसांना,गंभीर जखमी/कायमचे अपंगत्व आलेल्या कर्मचा-यांना सानुग्रह अनुदान देण्याबाबत.

संदर्भ :- १. राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्रमांक - रानिआ/जिपपंस/२००६/ प्र.क्र.२०/का-०७ दिनांक १०/०१/२०१२.

२. शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग क्रमांक सीईल-२०१४/प्र.क्र.६००/३३ दिनांक- ९ एप्रिल,२०१४

३. महाराष्ट्र शासन,ग्राम विकास व जलसंधारण विभाग,मंत्रालय,मुंबई ४०० ०३२ यांचेकडील शासन निर्णय क्रमांक :- ग्रापनि-२०१५/प्र.क्र.९६/ पंरा-२, दिनांक २० जून,२०१६ ( प्रत संलग्न ).

राज्य निवडणूक आयोगाच्या दिनांक १०/०१/२०१२ च्या आदेशान्वये राज्यातील महानगरपालिका,नगरपरिषदा,नगरपंचायती,जिल्हा परिषदा व पंचायत समित्या तसेच ग्रामपंचायतींच्या निवडणुकीमध्ये कर्तव्यार्थ हजर असलेल्या कर्मचा-यांचा कर्तव्य कालावधीमध्ये मृत्यू झाल्यास अथवा कर्तव्य बजावत असताना त्याला ईजा पोहचल्यास खाली नमूद केल्याप्रमाणे सानुग्रह अनुदान देण्याबाबत आदेशित करण्यात आले आहे.

| अ. क्र. | तपशिल | सानुग्रह अनुदानाचे दर |
|---|---|---|
| १ | निवडणुकीच्या कर्तव्यार्थ असताना मृत पावलेले अधिकारी/कर्मचारी यांचे वारस. | रु.०५,००,०००/- |
| २ | निवडणुकीच्या कर्तव्यार्थ असताना अतिरेकी कारवाया,नक्षलवादयांच्या कारवाया यात बॉम्ब स्फोट,सुरुंग अथवा शस्त्रास्त्रांचा हल्ला ( Road Mines,Bomb Blast,Armed Attac,etc. ) यामध्ये मृत पावलेले अधिकारी /कर्मचारी यांचे वारस | रु.१०,००,०००/- |
| ३ | निवडणुकीच्या कर्तव्यार्थ असताना कायमस्वरुपी अपंगत्व आलेले अधिकारी/कर्मचारी जसे हात/पाय/डोळा गमविणे. | रु.२,५०,०००/- |
| ४ | निवडणुकीच्या कर्तव्यार्थ असताना अतिरेकी कारवाया,नक्षलवादयांच्या कारवाया यात बॉम्बस्फोट,सुरुंग पेरणी अथवा शस्त्रास्त्रांचा हल्ला ( Road Mines,Bomb Blast, Armed Attacks etc. ) यात कायमस्वरुपी अपंगत्व आलेले अधिकारी/कर्मचारी. जसे हात/पाय/डोळा गमविणे. | रु.५,००,०००/- |

२. महाराष्ट्र शासन, सामन्य प्रशासन विभाग,मंत्रालय,मुंबई ४०० ०३२ यांनी संदर्भिय क्रमांक २ येथील दिनांक ९ एप्रिल,२०१४ चे शासन निर्णयानुसार भारत निवडणूक आयोगामार्फत घेण्यात येणा-या निवडणुकीच्या कर्तव्यावर असताना जखमी झालेल्या अधिकारी/कर्मचा-यांना व मृत झालेल्या अधिकारी व कर्मचा-यांच्या कुटुंबियांना दयावयाच्या सानुग्रह अनुदानाबाबत व संदर्भीय क्रमांक ३ अन्वये ग्राम विकास व जलसंधारण विभाग,बांधकाम भवन,मर्झबान पथ,मुंबई ४०० ००१ यांनी दिनांक २० जून,२०१६ चे शासन निर्णयानुसार ग्रामपंचायत,जिल्हा परिषदा व पंचायत समितीच्या निवडणुकांच्या वेळी कर्तव्यावर असताना मृत पावलेल्या अधिकारी/कर्मचा-यांच्या वारसांना,गंभीर जखमी/कायमचे अपंगत्व आलेल्या कर्मचा-यांना सानुग्रह अनुदान देण्याबाबत तरतुद केलेली आहे. त्याच धर्तीवर महानगरपालिका,नगरपरिषदा/नगरपंचायतींच्या निवडणुकीच्या कर्तव्यावर असलेल्या कर्मचा-यांच्या संदर्भातील वाढीव दराने सानुग्रह अनुदान मंजूर करणे आवश्यक आहे असे राज्य निवडणूक आयोगाचे मत झाले आहे.

३. वरील परिस्थितीत राज्यातील महानगरपालिका,नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या निवडणुकीमध्ये कर्तव्यार्थ हजर असलेल्या अधिकारी/कर्मचा-यांचा कर्तव्य कालावधीमध्ये मृत्यू झल्यास त्याच्या वारसाला अथवा कर्तव्य बजावत असतांना अधिकारी/कर्मचा-यास ईजा पोहचल्यास त्यांना खाली नमूद केल्याप्रमाणे वाढीव दराने सानुग्रह अनुदान देण्यात यावे असे आदेशित करण्यात येत आहे.

| अ.क्र. | तपशिल | सानुग्रह अनुदानाचे सुधारित दर |
|---|---|---|
| १ | निवडणुकीच्या कर्तव्यार्थ असताना मृत पावलेले अधिकारी/कर्मचारी यांचे वारस. | रु.१०,००,०००/- |
| २ | निवडणुकीच्या कर्तव्यार्थ असताना अतिरेकी कारवाया,नक्षलवादयांच्या कारवाया यात बॉम्ब स्फोट,सुरुंग पेरणी अथवा शस्त्रास्त्रांचा हल्ला ( Armed Attacks etc. ) मृत पावलेले अधिकारी /कर्मचारी यांचे वारस | रु.२०,००,०००/- |
| ३ | निवडणुकीच्या कर्तव्यार्थ असताना कायमस्वरुपी अपंगत्व आलेले अधिकारी/कर्मचारी (जसे हात/पाय/डोळा गमाविणे इ.) | रु.५,००,०००/- |
| ४ | निवडणुकीच्या कर्तव्यार्थ असताना अतिरेकी कारवाया,नक्षलवादयांच्या कारवाया यात बॉम्बस्फोट,सुरुंग पेरणी अथवा शस्त्रास्त्रांचा हल्ला ( Road Mines,Bomb Blast, Armed Attacks etc. ) यात कायमस्वरुपी अपंगत्व आलेले अधिकारी/कर्मचारी ( जसे हात/पाय/डोळा गमाविणे इ. ) | रु.१०,००,०००/- |

४. राज्यातील महानगरपालिका,नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या निवडणुकांवरील खर्च हा संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेने करावयाचा असल्याने असे अनुदानाचे प्रस्ताव प्रकरणपरत्वे संबंधित महानगरपालिका आयुक्त किंवा मुख्याधिकारी नगरपालिका/नगरपंचायत यांनी मंजूर करावेत.

राज्य निवडणूक आयुक्त यांचे आदेशानुसार,

( एम.एम. चन्ने )

सचिव

राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र.

प्रत :- १. सर्व विभागीय आयुक्त.

२. सर्व जिल्हाधिकारी (मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्हा वगळून)

३. सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषदा व नगरपंचायती.